स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/३४५ /१५**
**पुणे १ दिनांक :- २४/०७/२०१५**

**प्रति,**

**अध्यक्ष/सचिव,**
**समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर**
**ता. बारामती जि. पुणे**

**विषय:-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १ ,६ व २४) २०१२

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-१ दिनांक १५ जुन २०१३.

३) मा.शिक्षणउपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता/२३३७३/७६ /पुवि/१३/दि.१३ सप्टेंबर २०१३.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करणे, तसेच **विद्यमान शाळेचा दर्जावाढ** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ | ८ | ९ |
| **१** | **७३५** | **समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर ता. बारामती जि. पुणे** | **सह्याद्री पब्लिक स्कुल, खंडोबाची वाडी ता. बारामती जि. पुणे** | **इंग्रजी** | **जून २०१३** | **नवीन शाळा** | **प्राथमिक** |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये सन २०१३-१४ मध्ये सुरु असलेल्या वर्गांसह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी **(प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. **मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
२. **मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
३. **मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
४. **मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.**
५. **शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे-५.**

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/ ४४८/१६**
**पुणे १ दिनांक :- ७/४/२०१६**

प्रति,
अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर,बारामती संचलित सहयाद्री पब्लिक स्कुल, खंडोबाचीवाडी, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.**

**विषय:-** **सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगीमध्ये बदल करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम(महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १,६ व २४) २०१२.
२) मा. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)मशि-१, दि. १५ जून २०१३
३) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंशाळा/मान्यता/२३३७३/७६, दि. १३ सप्टेंबर २०१३
४) या कार्यालयचे पत्र क्र. शिक्षण/प्राथ-२/स्वयंशाळा/२४६/१५, दि. २४/७/२०१५.
५) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक एसएफएस-१०१५/ प्र.क्र.१३३ / एसएम-२, दि. ७/११/२० १५
६) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंशाळा/मान्यता/पुवि/१३/५०८८/८९, दि. 14/03/2016

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्र. ४ नुसार प्रथम मान्यत देण्यांत आलेली आहे. सदर आदेशामध्ये इंग्रजी माध्यम - प्राथमिकसाठी मान्यता देण्यांत आलेली आहे. संदर्भ क्र. ५ नुसार सदर शाळेस शासन शुध्दीपत्रकानुसार शाळा मान्यतामध्ये प्राथमिकमध्ये दुरुस्ती करुन प्राथमिक ऐवजी प्राथमिक ते उच्च माध्यमिक अशी दुरुस्ती करणेत आलेली आहे. सदर दुरुस्तीबाबत संदर्भ क्र. ६ अन्वये **समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर, ता. बारामती संचलित सहयाद्री पब्लिक स्कुल, खंडोवाचीवाडी, ता. बारामती, जि. पुणे या शाळेच्या मान्यता वर्ग मध्ये प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदलाचा मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा** आदेश प्राप्त झालेला आहे.

**सबब समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर, ता. बारामती संचलित सहयाद्री पब्लिक स्कुल, खंडोवाचीवाडी, ता. बारामती, जि. पुणे या शाळेच्या संदर्भ क्र. ४ या कार्यालयाच्या प्रथम मान्यता आदेशामध्ये वरील संदर्भ क्र. ५ व ६ ला अधीन राहून शाळेच्या प्रकारामध्ये** प्राथमिक ऐवजी प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदल करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१
५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती बारामती, ता. बारामती, जि. पुणे

परवानगी वर्ष :-२०१५-२०१६
माध्यम : इंग्रजी
स्वंयअर्थ सहाय्यित शाळा -कायम विना अनुदानित
(इंग्रजी नवीन माध्यमिक शाळा)

जा.क्र.शिउसं/माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१६/ १८७०८/93
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : -22 SEP 2016

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : स्वयंअर्थ सहाय्यित शाळेस प्रथम मान्यता मिळणेबाबत. . .**
सहयाद्री पब्लिक स्कूल, खंडोबाची वाडी, ता. बारामती, जि. पुणे

**संदर्भ :** १. आपले पत्र क्र. जि.प./शिक्षण/माध्य/आ.गिथी/५३१५/१५-१६ दिनांक ६/९/२०१६
२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रं.१, ६ व २४) २०१२
३. शासन निर्णय क्रं. एसएफएस-१०१५/प्र.क्र.१३३/एसएम-२ दिनांक ०७ नोव्हेंबर २०१५
४. या कार्यालयाचे पत्र क्रं. शिउसं/माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३/५०८८ दिनांक १४/३/२०१६

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर नगर, ता. बारामती, जि. पुणे संचलित सहयाद्री पब्लिक स्कूल, खंडोबाची वाडी, ता. बारामती, जि. पुणे माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी व १० वी** च्या वर्गास **२०१६-२०१७** या शैक्षणिक वर्षासाठी **जून २०१६** पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे
३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
४. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
७. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने, संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२. अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१५-१६** पासून असेल.
१३. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
१४. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य -अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र मराठी नवीन माध्यमिकम शाळा / वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६. महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७. महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-Dise मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१८. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावेव

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

५.प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.**

**२. अध्यक्ष/सचिव, समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर नगर, ता. बारामती, जि. पुणे**

**३. मुख्याध्यापक, सहयाद्री पब्लिक स्कूल, खंडोबाची वाडी, ता. बारामती, जि. पुणे**

**प्रत - माहितीसाठी सादर,**

**४.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.**

**५.निवडनस्ती.**

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७

वेब साईट- WWW.dydepune .com

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com


जा.क.शिउसं/उमाशि-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२२/४३ल

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 11 JAN 2023

प्रथम मान्यता २०२२-२३

माध्यम : इंग्रजी

स्वंयअर्थ सहाय्यित शाळा

प्रति

प्राचार्य सहयाद्री पब्लिक स्कूल, खंडोबाची वाडी, ता.बारामती,जि.पुणे

**विषय -** सन २०२१ -२०२२ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम मान्यता देण्याबाबत....

**संदर्भ** :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २० जुन २०१२
३. शासन शुध्दीपत्रक क्र. एसएफएस-२०१५/प्र.क्र.१३३/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई २ दि.०७/११/२०१५
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र दि.२२/११/२०२२

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ क्रमांक २ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे.त्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | पुणे | समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर, ता.बारामती, जि.पुणे | सहयाद्री पब्लिक स्कूल, खंडोबाची वाडी, ता.बारामती,जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक विज्ञान इ.११ वी स्वयंअर्थसहाय्यित | २०२२-२३ |

**अटी व शर्ती-**

१. ज्या व्यवस्थापनास सन २०२१-२२ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.

२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी

३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी

४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी

५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही

७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल

८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून असेल.

९ शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

११ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही

१२ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-Dise मध्ये माहिती भरताना स्वयं अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१३ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील

१४ सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.
शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

त माहितीसाठी सविनय सादर

१ मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२ मा. आयुक्त,शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे- १

३ मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

त माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११००१

ई-मेल-dydpune@gmail.com वेबसाईट-www.dydepune.com फोन.२०-२६१२ ५६९६/२२१७

जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०५/11240 दिनांक-०३/११/२०२३

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,

एस.डी.सहयाद्री पब्लिक स्कूल व ज्यूनिअर कॉलेज, खंडोबाची वाडी, ता.बारामती, जि.पुणे

**विषय-** इयत्ता-१२वी वर्गास नैसर्गिक वाढीने स्वयंअर्थसहायित तत्त्वावर मान्यता देणेबाबत.
(नवीन शाळा - मूळ वर्ग)

**संदर्भ-** १.शासन शुध्दीपत्रक पत्र क्र. एसएफएस-१०१५/प्र.क्र.१३३/एसएम-२ दि.०७/११/२०१५
२.या कार्यालयाचे पत्र जाक्र.शिउसं/उमाशि-१/२०२२/१५४ दि.०५/०१/२०२३.
३.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे यांचेकडील पत्र जाक्र.पुजिप/१५४ दि.०५/०१/२०२३

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते, संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत, आपले विद्यालयास खाली नमूद केलेनुसार उच्च माध्यमिक वर्ग/शाखा/तुकड्या स्वयंअर्थसहायित तत्त्वावर मंजूर करणेत आलेल्या आहेत. संदर्भ क्र.२ अन्वये सदर (इ.११वी) वर्गांना प्रथम मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.३ अन्वये इ.१२वी वर्गास नैसर्गिक वाढीने मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव तपासून सादर करण्यात आलेला होता.

**याद्वारे खालील नमूद इ.१२वी वर्गांना नैसर्गिक वाढीने स्वयंअर्थसहायित तत्त्वावर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| संस्थेचे नाव | उच्च माध्यमिक शाळेचे नाव | मंजूर वर्ग | माध्यम | प्रकार | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| समर्थ ज्ञानपीठ | एस.डी.सहयाद्री पब्लिक स्कूल व ज्यूनिअर कॉलेज, खंडोबाची वाडी, ता.बारामती, जि.पुणे | इ.१२वी विज्ञान - प्रथम | इंग्रजी | स्वयं अर्थसहायित तत्त्वावर | २०२३-२४ |

**टीप-** मूळ परवानगी देण्यात आलेला शासन निर्णय, प्रथम मान्यता / खाते मान्यता आदेशामध्ये नमूद अटी व शर्ती तसे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

(राजेंद्र अहिरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

प्रत, माहितीस्तव-
१.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५
२.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे/अहमदनगर/ सोलापूर.